


दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३९१ वा • बुधवार, ता. २७ ऑगस्ट २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


ता. २७ /०८/२०२५ रोजी गणेश चतुर्थी निमित्त आपल्या कार्यालयास सुट्टी राहिल. तरी ता. २८/०८/२०२५ रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही. तरी वाचक, बातमीदार यांनी नोंद घ्यावी.

**दैनिक रयत समाचार**
मुख्य संपादक

# फडणवीस सरकारचा केदारेश्वरला हातभार

## पूर्व भागातील राजकारणाला नवी दिशा



**पाथर्डी । नितीन गटाणी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते ॲड. प्रताप ढाकणे यांच्या ताब्यातील संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या मुदती कर्जासाठी शासनहमीवर उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला. या निर्णयाकडे जिल्ह्याच्या सहकारक्षेत्राचे लक्ष लागले होते. जिल्ह्याच्या सहकार चळवळीच्या वर्तुळात गेल्या काही वर्षांपासून निधीसाठी व विविध शासकीय कामकाजाबाबत केदारेश्वर साखर कारखान्याला स्थापनेपासूनच संघर्ष करावा लागला. माजी मंत्री स्व. बबनराव ढाकणे यांनी विविध पातळ्यांवर संघर्ष करत कारखाना टिकवला. त्यानंतर दुसऱ्या पिढीतही कारखान्याचे अस्तित्व जिवंत ठेवत ऊस उत्पादक कामगार व मजुरांना न्याय देण्यासाठी प्रताप ढाकणे यांनीही संघर्ष केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कारखान्याला मदत करण्याचा घेतलेला निर्णय भावी राजकीय हालचालींकडे निर्देश करणारा आहे. शासनाने सहकारी बँकेकडून मुदती कर्ज शासन हमीवर उपलब्ध करून देणे हा निर्णय जिल्ह्याच्या साखर कारखानदारीच्या वर्तुळातही चर्चेचा




ठरला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून ढाकणे यांनी अहोरात्र परिश्रम करत मुंबई व प्रसंगी दिल्ली येथेही संबंधितांशी चर्चा करून कारखान्याला आर्थिक मदतीसाठी प्रयत्न केले. त्याचाच एक भाग म्हणून मंत्रिमंडळाने केदारेश्वर कारखान्याला मदत करण्याचा निर्णय घेत राज्य शासनाची मान्यता दिली. गेल्या महिन्याभरापासून केदारेश्वर कारखान्याचे पैसे मिळावेत म्हणून कार्यक्षेत्रातील विविध शेतकऱ्यांनी जोरदार मागणी केली आहे. आता प्रशासकीय टप्प्यांची पूर्तता लवकरात लवकर होऊन शेतकऱ्यांनाही पैसे मिळण्याचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला. जिल्ह्याच्या राजकारणात साखर कारखानदारी ही केंद्रस्थानी ठरत असल्याने यासाठी पक्ष भेद विसरून राजकीय हितसंबंध जोपासले जातात. शेवगाव– पाथर्डी मतदार संघ व शेजारील नेवासा तालुक्यात मिळून चाललेले राजकारण कारखान्यांभोवती फिरत असते. मुळा, ज्ञानेश्वर, वृद्धेश्वर, केदारेश्वर व खाजगी स्वरूपात चालविला जाणारा गंगामाई अशा विविध साखर कारखान्यांची ऊस मिळविण्यासाठीची धडपड ही सुद्धा राजकीय प्रभावाखाली सुरू असते. केदारेश्वर कारखाना पूर्व भागातील ऊस उत्पादकांसाठी दिलासादायक ठरत असल्याने जर तो कारखाना बंद राहिला तर त्या कार्यक्षेत्रातला ऊस आपल्याला मिळू शकेल अशी सुप्त स्पर्धा ढाकणेंना मुंबई येथे ठाण



मांडून ठेवण्यास कारणीभूत ठरली. याबाबत ॲड. प्रताप ढाकणे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी कर्ज हमीचा आकडा सांगण्यास असमर्थता दर्शविली. मात्र मंत्रिमंडळ बैठकीमध्ये मदत करण्याचा निर्णय झाल्याने आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचे आभार मानतो. सहकारात राजकारण नसते या आर्थिक बाबीतही कोणीही राजकीय दृष्टीने बघू नये, असे सांगत राजकीय भाष्य करण्यास नकार दिला.

## गणपती : गोंगाटाची नव्हे तर बुद्धी, शांती, सृजनशीलता नवनिर्मितीची देवता



जिथे सुरक्षेची खात्री असते तिथे लोक एकत्र येत असतात. या एकत्र आलेल्या लोकांना पूर्वी गण म्हटले जायचे. सुपीक नदीपात्राच्या परिसरात जिथे उत्तम जमीन, मुबलक पाणी आणि निरव शांतता आणि गणाच्या एकत्रितपणे राहण्याच्या स्वभाव आणि वृत्तीमुळे गनसमाज निर्माण झाला. या गणांचा नायक तो गणनायक. गणांचा अधिपती या अर्थाने गणपती. गणसमाजाला स्थिरता आणि सुरक्षितता प्राप्त करून देण्याचे कार्य गणपती या त्यांच्या अधिपतीमुळे सहज शक्य झाले. गणपती हा अतिशय शांतपणे विचार करणारा बुद्धिमान असा नायक जो कायम नवनिर्माण करण्यात मग्न असल्याने त्याला गणसामाजच्या विकासासाठी शांतता अत्यंत प्रिय होती. त्याला गोंगाट अजिबात पसंद नव्हता. गनसमाजाचा सतत विकास होत राहावा, त्यांच्यात शिस्त यावी यासाठी गणाधिशाने सृजनशीलतेला अधिक महत्व द्यायला सुरुवात केली. शेती, संगीत, शास्त्र, कला, विद्या, स्थापत्य यांच्या विकासाला चालना देण्यासाठी त्याने वर्षाला गणसमाजात प्रतियोगीता सुरू केल्या. दरवर्षी विविध गणसमाजातील गणाधिश एकत्र येऊन आपल्या गणांच्या सहकार्याने या स्पर्धा पार पाडत त्यात संगीत, नृत्य, शेतीतील विविध शोध, अशाप्रकारे विविध स्पर्धा होत असत. वेगळे आणि नाविन्यपूर्ण स्पर्धात्मक प्राविण्य दाखविणाऱ्या गणास विशेष पुरस्काराने सन्मानित केले जात. गणांनी एकत्र येऊन करायचा उत्सव म्हणून त्याला आपण गणोत्सव म्हणू शकतो. गणाधिश गणपती हाच संपूर्ण गनसमाजाचा प्रमुख असल्याने गणांचा विकास आणि असे होत असताना गणसमाजामध्ये शांतता कशी नांदेल याला त्याचे प्राधान्य असायचे. गणसमाजाचा हा गणाधिश गणपती त्या काळातील संस्कृतीशी म्हणजेच शेती संस्कृतीशी संबंधित असल्याने शेतीमातीत राबणाऱ्या लोकांचा विकास आणि त्यात राबणाऱ्या लोकांचा उत्सव तोच गणोत्सव होता. खरीप हंगामाच्या वेळेस भात लावताना गाणी म्हणत हा शेतकरी गण आपला उत्सव साजरा करायचा तर कापणीच्या वेळेस खळे करत असताना गाणे म्हणत पुन्हा तालासुरात गाणे म्हणत, नृत्य करत निसर्गाच्या कृपेने आणि गणाधिशाच्या आशिर्वादाने आलेली धान्य रास पाहून तृप्त व्हायचा. मग अशा दिवशी सार्वजनिक भिजनावळी व्हायच्या. गणसमाजात आनंदी आनंद असायचा. लोक गाणी म्हणत, नृत्य करत आपला आनंद साजरा करायचे परंतु तो त्यांच्या नवनिर्मिती आणि सृजनशीलतेचा उत्सव होता, गोगाट धांगडधिंगा नव्हता. मुळात गणसमाजाची मुख्य प्रेरणास्त्रोत आहे. ती सुखाची, आनंदाची, बुद्धीची, नवनिर्मितीची आणि मुख्य म्हणजे शांततेची देवता आहे. समाजात अशांतता पसरविणाऱ्याला गणाचा प्रमुख या भूमिकेतून गणपती अशा उपद्रवीमूल्य पेरणाऱ्या वृत्तीला शिक्षा द्यायचा, शासन करायचा. समाजात शांतता पेरणाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करायचा. आणि समाजाच्या विकासासाठी, म्हणजे समाजात शांतता आणि नवनिर्मिती या दोन्हीसाठी कार्य करणाऱ्या समाजसाक्षर गणाला आपल्या गणातील विशेष पदावर नियुक्ती करून समाजविकासासाठी गणसमाजातील प्रत्येक व्यक्तीला प्रेरित करायचा. पण आज या सर्व गोष्टींची चिकित्सा केली असता आजचा समाज गोंगाट, नैराश्य यात स्वतः बुडालेला आहे. समाजातील उपद्रवीमूल्य व्यवस्था समाजात सतत अशांतता कशी राहील यासाठीच प्रयत्नरत असतात. गणपतीने समाजाला दिलेली शिकवण ते कधीचेच विसरले असून गणपतीच्या नावाखाली गणपतीने दिलेली शिस्त, शांतता, ज्ञान, सृजनशीलता याची शिकवण हळूहळू विसरली जाऊन भडकावूपणा, गोंगाट, अशांतता यांना महत्व आणि प्राधान्य दिले जात आहे. आणि अशा गोष्टीला गणेशोत्सव म्हटले जात आहे. मुळात सृजनशीलता आणि शांततेची देवता असणाऱ्या गणाधीशाचा हा अपमान आणि उपमर्द आहे

**ॲड. निरज धुमाळ,**
पुणे, ८७६७३४७१२२,
आम्ही सारे भारतीय

**धर्मसंवाद**

हे आपला समाज समजून का घेत नाही ? हा खरा प्रश्न आहे. समाजात बेशिस्त निर्माण करून, समाजात कर्णकर्कश साधनांचा वापर करून गोंगाट आणि अशांतता पसरवून ही बुद्धीची, शांततेची देवता असणारा गणपती कधीही प्रसन्न होणार नाही तर समाजात राहणाऱ्या कोणालाही त्रास होणार नाही, सगळ्यांचे जीवन आनंदाचे, शांततेचे आणि उत्साहाचे कसे होईल यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी गणाधिश गणपती सदैव असतो आणि त्याचा विकास करतो हे खऱ्या गणेशभक्ताने समजून घेणे आवश्यक आहे. गणपती ही अज्ञानाची नव्हे तर ज्ञानाची देवता आहे. गणपती ही गोंगाटाची नव्हे तर शांततेची देवता आहे. गणपती हा भडकावूपणाचा नायक नसून नवनिर्मिती आणि प्रगतीचा गणनायक आहे हे आपल्यातील प्रत्येकाने समजून घेण्याची हिच खरी वेळ आहे. गणाधिश, गणाधिनायक गणपतीचा जयजयकार असो...

# वादग्रस्त १२ एकर भूखंडावर आ.रोहित पवारांची पाहणी




**नवी मुंबई । रयत समाचार**

नवी मुंबईतील सिडकोने बिवलकर कुटुंबाला दिलेल्या तब्बल ५ हजार कोटींपेक्षा अधिक किमतीच्या १२ एकर वादग्रस्त भूखंडाची पाहणी आमदार रोहित पवार यांनी स्थानिक भूमिपुत्र, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केली. या जागेवर सध्या काही बांधकामं सुरू असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आल्याचं पवार यांनी सांगितलं. संबंधित भूखंडाबाबत सर्वोच्च न्यायालयात दावा प्रलंबित आहे. राज्य सरकारने या प्रकरणात बिवलकर कुटुंबाच्या विरोधात भूमिका घेतली असूनही येथे सुरू असलेलं बांधकाम गंभीर असल्याचे पवार यांनी निदर्शनास आणले. ''या ठिकाणी साध्या माणसाने आयुष्यभराची पुंजी खर्च करून घर घेतलं आणि सर्वोच्च न्यायालयाने निकाल बिवलकर कुटुंबाच्या विरोधात दिला, तर त्यांची मोठी फसवणूक होईल. त्यामुळे कोणत्याही नागरिकांनी या ठिकाणी घर घेऊ नये,'' असा इशारा पवारांनी दिला. काल झालेल्या पत्रकार परिषदेतही त्यांनी ही बाब मुख्यमंत्री यांच्या लक्षात आणून दिल्याचे सांगत, ''वादग्रस्त भूखंडावरील सुरू असलेली बांधकामं तातडीने थांबवण्यात यावीत, जेणेकरून सामान्य माणसांची फसवणूक होणार नाही,'' अशी ठाम मागणी पवार यांनी केली.

# लाज व दुःखाशिवाय काही उरलेले नाही

## रॉयटर्सची वरिष्ठ पत्रकार व्हॅलेरी झिंक यांचा संताप

**लंडन (यु.के.) । रयत समाचार**

गाझामध्ये सुरू असलेल्या भीषण युद्धात आतापर्यंत २५० हून अधिक पत्रकारांचा बळी गेला असून या परिस्थितीबद्दल नामांकित वृत्तसंस्था रॉयटर्सने पत्रकारांचा विश्वासघात केला असा गंभीर आरोप संस्थेतील वरिष्ठ पत्रकार व्हॅलेरी झिंक यांनी केला आहे. गेल्या आठ वर्षांपासून रॉयटर्समध्ये कार्यरत असलेल्या झिंक यांनी आपल्या संतापाची पराकाष्ठा गाठत थेट राजीनामा दिला आणि आपले प्रेस ओळखपत्र दोन तुकडे करून निषेध व्यक्त केला. त्या म्हणाल्या,




''गेल्या दोन वर्षांत गाझामध्ये झालेले पत्रकारांचे मृत्यू हे पहिले–दुसरे महायुद्ध, कोरिया, व्हिएतनाम, अफगाणिस्तान, युगोस्लाव्हिया आणि युक्रेन या युद्धांपेक्षा अधिक आहेत. निरपराधांना उपाशी ठेवणे, मुलांना क्रूरपणे ठार मारणे आणि लोकांना जिवंत जाळणे हे मानवतेस काळिमा फासणारे कृत्य आहे. अशा संस्थेचे कार्ड मी बाळगावे, अशी माझी तयारी नाही.''त्यांच्या या निर्णयाने आंतरराष्ट्रीय पत्रकारितेत धक्का बसला असून पत्रकारांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा गंभीर चर्चेला तोंड फुटले आहे.

## लाल पोस्टपेट्या बंद होणार नाहीत; अफवा खोटी

**अहमदनगर । रयत समाचार**




गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर ''भारतीय डाक विभागाने १ सप्टेंबर २०२५ पासून टपाल पेट्या कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे'' असा दावा मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता. मात्र, ही माहिती पूर्णपणे खोटी असल्याचे भारतीय डाक विभागाने स्पष्ट केले आहे.

India Post ने आपल्या अधिकृत एक्स (पूर्वीचे ट्विटर) खात्यावर लिहिले आहे, आमच्या लाल टपाल पेट्या कायम राहतील, त्या कुठेही हटवल्या जाणार नाहीत. त्यामुळे टपाल पेट्या बंद होणार असल्याचा दावा फक्त अफवा असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, १८५४ पासून सुरू असलेली 'रजिस्टर पोस्ट' सेवा मात्र ता. १ सप्टेंबर २०२५ पासून थांबणार असून ती स्पीड पोस्टमध्ये विलीन होणार आहे. यापुढे नागरिकांना सुरक्षित व जलद सेवा देण्यासाठी केवळ स्पीड पोस्टच उपलब्ध राहील. डाक विभागाने स्पष्ट केले की, टपाल पेट्या पूर्वीप्रमाणेच नागरिकांच्या सेवेत कायम राहतील. त्यामुळे या अफवेवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले.

## मुरगाव पोर्टवर बार्ज बुडाली; धोकादायक अवशेषामुळे चिंता



**पणजी । रयत समाचार**

मुरगाव पोर्ट प्राधिकरणाच्या हद्दीत लोखंडी प्लेट्स वाहतुकीसाठी जाणारी एक बार्ज बुडाली. सुदैवाने या घटनेत बार्जवरील आठ खलाशांना सुखरूप वाचवण्यात आले. दुर्घटना पाण्याखालील जुन्या जहाजाच्या अवशेषाला धडकल्यामुळे झाली. बार्ज बंदरात उभ्या असलेल्या जहाजाला लोखंडी प्लेट्स पोहोचवण्यासाठी जात असताना पाण्याखालील एका जहाजाच्या अवशेषाला धडकली. या धडकेत बार्जच्या तळाला मोठी भेग पडली आणि पाणी शिरले. त्यानंतर खलाशांना तातडीने बाहेर काढण्यात आले. धडकल्यानंतर बार्ज त्या जहाजाच्या अवशेषात अडकून राहिला. बार्ज मालकाने फ्लोटिंग क्रेनच्या मदतीने तो बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, परंतु जोरदार वाऱ्यामुळे व समुद्र खवळलेला असल्याने ही कारवाई पुढे ढकलण्यात आली. स्थानिकांनी धोकादायक अवशेषावरील चिंता व्यक्त केली आहे. वर्षांपूर्वी उथळ पाण्यात बुडालेल्या दोन जहाजांपैकी एक अवशेष एमपीएने हटवला असला, तरी दुसरा अवशेष अजूनही तिथे आहे. अनेक वर्षांपासून हा अवशेष बार्ज, मासेमारी नौका आणि छोट्या बोटींसाठी अपघाताचे कारण ठरत आहे. स्थानिकांनी या धोकादायक अवशेषाचे तातडीने निर्मूलन करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून भविष्यातील अपघात टाळता येतील.

# साहित्यिकांनी समाजाला दिशा देणारे साहित्य तयार करावे- नामुगडे

**पुणे । श्रीकांत काकतीकर**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेने १९ ऑगस्ट रोजी महात्मा फुले सांस्कृतिक भवन, पुणे येथे चौथा राज्यस्तरीय राजकुमार काळभोर स्मृती साहित्य संमेलनाचे आयोजन केले. राज्यभरातून ३५० हून अधिक साहित्यिकांनी संमेलनात सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक सूर्यकांत नामुगडे म्हणाले की, साहित्यिक हा निरपेक्ष असला पाहिजे आणि समाजातील प्रश्नांवर आपल्या लेखणीतून वाचा फोडली पाहिजे. समाजाला दिशा देणाऱ्या साहित्याची निर्मिती व्हावी ही साहित्यिकांची मुख्य जबाबदारी आहे. सुप्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक किशोर टिळेकर यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. त्यांच्या विनोदी कवितांना रसिकांनी भरभरून दाद दिली. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व संमेलनाचे निमंत्रक डॉ. शरद गोरे यांनी प्रास्ताविक भाषणात ठळकपणे सांगितले की, जाती धर्माच्या संकुचित भिंती तोडून मानवतावादी विचारांचे बीजारोपण करणे काळाची नितांत गरज आहे. साहित्यिकांनी सत्याची बाजू घेत, जनसामान्यांचा कैवार आपल्या साहित्यकृतीतून उलगडला पाहिजे. साहित्य परिषदेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष शुभांगीताई काळभोर, राष्ट्रीय खजिनदार फुलचंद नागटिळक, विश्वस्त द्यानेश्वर पतंगे, महाराष्ट्र उपाध्यक्ष दत्तात्रय भोंगळे, हनुमंत चिकणे, समीर गुधाटे, महाराष्ट्र सरचिटणीस संतोष शेलार, सुनील लोणकर, पुरुषोत्तम हिंगणकर, मराठवाडा प्रदेशाध्यक्ष परमेश्वर पालकर, उपाध्यक्ष तुकाराम गंगावणे, शहराध्यक्ष द्यानेश्वर धायरीकर, मुख्य संयोजक अमोल कुंभार, पश्चिम महाराष्ट्र युवा प्रदेशाध्यक्ष सुमेध गायकवाड, संघटक सुजाता गुरव, जयश्री नांदे, सिंधू साळेकर, जिल्हाध्यक्ष प्रा. सुरेश वाळेकर, रमेश रेडेकर, मधुकर गिलबिले, युवा जिल्हाध्यक्ष विशाल काळभोर, संदेश जाधव, महिला जिल्हाध्यक्ष प्रा. कविता शिर्के, प्रा. कविता ढोले यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. या संमेलनात आरती सोनवणे यांच्या काव्यसंग्रह ''मनातलं माझं'' आणि भारती झिमरे यांच्या ग्रंथाचे प्रकाशन झाले. तसेच, प्रतिभा मगर, पल्लवी दंडवते, तानाजी धरणे यांना साहित्यिक योगदानासाठी तर बाळकृष्ण अमृतकर यांना सामाजिक योगदानासाठी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कविसंमेलनाचे तीन सत्र सुभाष सोनवणे, अलका नाईक व तुकाराम गंगावणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या सत्रांत तृप्ती मुदगल, वर्षा मुस्केवाड, सुवर्णा वाघमारे, शरद नवले यांच्या कवितांना रसिकांनी भरभरून दाद दिली. रमेश रेडेकर यांनी कविसंमेलनाचे बहारदार सूत्रसंचलन केले. यावेळी साहित्य परिषदेच्या नवनियुक्त पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. मुसळधार पावसातही मोठ्या संख्येने साहित्यिक व रसिकांनी हजेरी लक्षणीय राहिली. संमेलनाचा समारोप रात्री ८:३० वाजता झाला.





## २५ वर्षे विनाअपघात सेवा

# एसटी चालकांचा सपत्नीक सन्मान


**अहमदनगर । रयत समाचार**

एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त चालकांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. सेवेत असताना २५ वर्षे विना अपघात सेवा देणाऱ्या चालकांना प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांच्या हस्ते चालक सतीश श्रीराम, अकुंश लोंढे, सुनिल क्षीरसागर व अशोक भैलुमे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त संघटनेचे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे, खजिनदार विठ्ठल देवकर, संघटक प्रमोद गाडळकर, महामंडळाचे अधिकारी, पदाधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. एसटी महामंडळातील चालकांनी कार्यरत असताना २५ वर्षे विना अपघात सेवा दिली होती. मात्र त्यांचा योग्य सन्मान झालेला नव्हता. राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटना, अहिल्यानगर विभागाने सातत्याने पाठपुरावा करून अखेर चालकांना त्यांचा हक्काचा सन्मान मिळवून दिला. बलभीम कुबडे म्हणाले, ''सेवानिवृत्त कामगारांचे न्याय-हक्क मिळवून देणे हे संघटनेचे मुख्य कार्य आहे. संघर्षाशिवाय हक्क पदरात पडत नाहीत. २५ वर्षे विना अपघात सेवा देऊनही सन्मानासाठी संघर्ष करावा लागतो, हे मोठे दुर्दैव आहे. कामगारांच्या पेन्शन, थकीत देयके व करार विषयक मागण्यांसाठी आम्हाला पुढे आंदोलन उभारावे लागणार आहे.'' सेवानिवृत्त झालेल्या चालकांचा सन्मान होण्यासाठी संघटनेचे अर्जुनराव बकरे, गोरख बेळगे व गंगाधर कोतकर यांचे विशेष सहकार्य लाभले. सत्कारमुर्तींनी हक्काचा सन्मान मिळवून दिल्याबद्दल संघटनेचे आभार व्यक्त करण्यात आले.

## ३२ वर्ष निष्ठावान सेवा

# स.पो.नि. शनीधर त्र्यंबके यांचा सन्मान



**अहमदनगर । रयत समाचार**

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शनीधर त्र्यंबके यांच्या सलग ३२ वर्षांच्या निष्ठावान सेवेसाठी आणि अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील व्हिसा विभागात त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल हार्दिक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी परदेशी व स्थानिक मेहेरबाबा प्रेमींनी त्यांचा सेवानिवृत्ती निम्मित्त सन्मान केला. या कार्यक्रमात डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांच्या हस्ते शनीधर त्र्यंबके यांना मानपत्र व कृतज्ञतेचे मानचिन्ह दिले गेले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल अमोल राऊत, किशोर पठारे, सोमनाथ वडणे, अॅलन वॅग्नर, क्रेक रूफ, हैदर नेले, जेन्स रेमॅन, शेली रेमेने, फ्लन्ट मॅग्रेट, केसी कुक, राहुल कांबळे आदींसह परदेशी व स्थानिक मेहेरबाबा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्र्यंबके यांनी प्रामाणिकता, परिश्रमशीलता आणि सेवाभावाच्या माध्यमातून अनेक परदेशी मेहेरबाबा प्रेमींना दिलासा व मदत दिली आहे. म्हणूनच अवतार मेहेरबाबा ट्रस्ट, मेहेरनाथ कलचुरी व सर्व मेहेरबाबा प्रेमींनी त्यांचा सन्मान नगरमधील मेहेर सेंटरमध्ये केला. परदेशी नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते; सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवणे आणि पोलिसांकडे ती सादर करणे आवश्यक असते. शनीधर त्र्यंबके यांच्या सहकार्यामुळे गेली ३२ वर्षे व्हिसा विभाग सर्व परदेशी नागरिकांना मदत करत आहे, फोनद्वारे कागदपत्र मागवणे व अडचणी सोडवणे यासह सहकार्य करत आले आहे. अशा प्रकारचा परदेशी नागरिकांकडून पोलिसांचा सन्मान क्वचितच घडतो.

# प्रेषितांनी दया, करुणा, समानता आणि सेवाभावाचा संदेश दिला– तांबोली

## सावित्रीबाई फुले शाळेत रक्तगट तपासणी शिबिर



**अहमदनगर । आबीद खान**

प्रेषित हजरत मोहम्मद मुस्तफा (स.) यांनी मानवजातीला दिलेला संदेश म्हणजे दया, करुणा, समानता आणि सेवाभाव. त्या शिकवणीला अनुसरून समाजोपयोगी कार्य म्हणून रक्तगट तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. रक्तदान हे जीवनदान आहे. मात्र त्यासाठी पहिले महत्त्वाचे पाऊल म्हणजे रक्तगट माहिती असणे आवश्यक आहे. आपला रक्तगट माहिती असेल तर आपत्कालीन परिस्थितीत आपण त्वरित मदत करू शकतो, दुसऱ्यांचे प्राण वाचवण्यासाठी धावून जाऊ शकतो. या शिबिराचा उद्देश केवळ तपासणी नसून सेवाभावाची एक सुरुवात आहे, असे प्रतिपादन अल करम हॉस्पिटलचे एजाज तांबोली यांनी केले. अल करम हॉस्पिटलच्या वतीने पैगंबर जयंतीनिमित्त मुकुंदनगर येथील सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. या प्रसंगी मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, संस्थेचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुस सलाम, फरीदा भाभी, गौसिया तांबोली, अल करम हॉस्पिटलचे एजाज तांबोली, मुख्याध्यापक सय्यद नौशाद, शिक्षक शेख फरजाना दिलावर, शेख अस्लम पटेल, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उज़्मा, शेख यास्मीन व शेख सुलताना आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिराच्या माध्यमातून पैगंबर यांच्या जीवनातील मोठा संदेश अधोरेखित झाला ''सर्वोत्तम मनुष्य तो आहे जो दुसऱ्यांच्या कामी येतो.'' ही शिकवण आपण सर्वांनी आचरणात आणली, तर समाजात एकोपा, आरोग्य व बंधुभाव वृद्धिंगत होईल, असे आबीद दुलेखान यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक सय्यद नौशाद यांनी आयोजक, डॉक्टर व या शिबिरात सहभागी झालेल्या सर्वांचे आभार मानले. ''अल्लाह ताआला आपल्याला अशा समाजोपयोगी कार्यात यश देवो आणि पैगंबर यांच्या शिकवणीनुसार चालण्याची तौफीक देवो,'' अशी दुआ त्यांनी केली.

# विशाल गणेश मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

**अहमदनगर । रयत समाचार**



शहराचे ग्रामदैवत असलेल्या माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिरात गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ता. २७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.१५ वा. जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे व सौ. घार्गे यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा विधीवत पार पडणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष अॅड. अभय आगरकर यांनी दिली. धार्मिक कार्यक्रमांचे वेळापत्रक: २७ ऑगस्ट पहाटे महापुजा, सकाळी ९ वा. 'रुद्रवंश' ढोल पथकाची मानवंदना व प्राणप्रतिष्ठा, ३ ते ५ सप्टेंबर चंद्रकांत सुखदेव दहिंडे परिवारातर्फे श्री गणेशयाग (पौरोहित्य : नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे गुरुजी), ३ सप्टेंबर सकाळी ९ वा. आरोही महिला ढोल पथकाचे वादन, ५ सप्टेंबर सकाळी ८.३० वा. महिलांचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण व महाआरती, ६ सप्टेंबर (गणेश विसर्जन) सकाळी ८.३० वा. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व सौ. आशिया यांच्या हस्ते उत्थापन पूजा व मिरवणुकीस प्रारंभ. मिरवणुकीत सनई चौघडा, युगंधर व रुद्रनाद ढोल पथकाचे वादन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, भाविकांच्या सोयीसाठी मंडप व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे, असे अॅड. आगरकर यांनी सांगितले. गणेशोत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडुरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापुसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा. माणिक विधाते, संजय चाफे, नितिन पुंड यांच्यासह श्री विशाल गणेश सेवा मंडळ व भक्तगण प्रयत्नशील आहेत.




# अहमदनगर कॉलेजला उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्कार

**अहमदनगर । रयत समाचार**

क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यश, सातत्यपूर्ण कामगिरी व विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रेरणादायी मार्गदर्शनाच्या बळावर अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगरने आणखी एक मानाचा तुरा आपल्या शिरपेचात रोवला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळ तसेच अहिल्यानगर जिल्हा झोनल क्रीडा समिती तर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या कालावधीतील उत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय पुरस्काराच्या मानाने अहमदनगर कॉलेजला गौरविण्यात आले. तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या संख्येमधून ही गौरवाची निवड करण्यात आली असून, कॉलेजच्या क्रीडा क्षेत्रातील यशस्वी कामगिरीची अधिकृत दखल घेतली गेली आहे. हा पुरस्कार कॉलेजतर्फे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे आणि क्रीडा संचालक डॉ. साविओ व्हिएगस यांनी औपचारिकरीत्या स्वीकारला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला, प्राध्यापकांच्या समर्पित मार्गदर्शनाला आणि सर्व कर्मचारी वर्गाच्या सहकार्यास या पुरस्कारातून उचित मान्यता मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल क्रीडा संचालक डॉ. साविओ व्हिएगस यांचा सत्कार बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर.जे. बार्नबस यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी प्राचार्यांनी कॉलेजच्या क्रीडाक्षेत्रातील परंपरेचा गौरव करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरित केले. कॉलेजमधील विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरमहाविद्यालयीन पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळेच हा सन्मान मिळाल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांसह क्रीडा विभागातील सर्व प्रशिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी वर्गाचे कौतुक होत असून, या पुरस्कारामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत अधिक जोश निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला गेला आहे. अहमदनगर कॉलेजच्या या सन्मानामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळाली असून, महाविद्यालयातील खेळाडूंमध्ये आगामी स्पर्धांसाठी नवीन उत्साह संचारला आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून अहमदनगर कॉलेजवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची केंद्रीय कार्यकारिणी बैठक उत्साहात

## कंत्राटी कामगारांना कायम करण्यासाठी राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा




**अहमदनगर । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची केंद्रीय कार्यकारिणी बैठक शहरात उत्साहात पार पडली. या बैठकीत शासनाच्या कामगार विरोधी धोरणाच्या विरोधात ठाम भूमिका घेत राज्यव्यापी आंदोलन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. बैठकीत नोकर भरती, पदोन्नती, आरक्षण तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरून कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करण्याचे ठराव घेण्यात आले. राज्याध्यक्ष एन.एम. पवळे यांनी सर्व कर्मचाऱ्यांनी संघटनेबरोबर एकजुटीने उभे राहून हक्क मिळवावे, असे आवाहन केले. बैठकीत जातीचे बनावट दाखले सादर करून आरक्षणाचा गैरफायदा घेणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याबाबत महासंघ पुढाकार घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच पुढील राज्य अधिवेशनाबाबत चर्चा झाली, केंद्रीय कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि नवीन पदाधिकाऱ्यांना मान्यता देण्यात आली. बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष के.के. जाधव यांनी केले, तर आभार निवृत्ती आरू यांनी मानले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# जनावरांचा बाजार बनला चराऊ कुरण

**लोणी । शफीक बागवान**




कुणी हिशोब विचारीत नसल्याने अधिकारी आणि कर्मचारी संगनमताने लोणी जनावरांच्या बाजारात गफला करीत आहेत. लोणी जनावरांचा बाजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी आता चराऊ कुरण बनला आहे. राहता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अखत्यारित लोणी उपबाजार कार्यरत आहे. लोणी येथील जनावरांचा बाजार राज्यात दुसऱ्या तिसऱ्या क्रमांकावर आहे.

या बाजारात राज्यभरातून गायी म्हशी अशी दुधाळ तशीच काही भाकड जनावरे सुद्धा राज्यभरातून मोठमोठ्या वाहनांमधून विक्रीसाठी येतात. या बाजारात येणाऱ्या जनावरांच्या कर वसुलीसाठी काही कर्मचारी येथे कार्यरत आहेत. या जनावरांच्या बाजारात येणाऱ्या वाहनांचा करवसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे हिशोब जरी असला तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांना तो परफेक्ट दिला जात नाही. वाहनांमध्ये अनेक जनावरे असतात त्यांची ठराविक कर वसुली केली जाते मात्र हे कर्मचारी काही वाहनांना पावत्या देतात तर काहींना ते देत नाहीत मात्र पावती न देता काही जनावरे घेऊन येणाऱ्या वाहनधारकांकडून मोठया प्रमाणावर रकमा घेतल्या जात असल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. लोणी जनावरांच्या बाजारातील कर वसुली करणारे हे कर्मचारी बेकायदेशीरपणे गेल्या काही वर्षांपासून ही व अशी वसुली करत असल्याच्या काही तक्रारी हाती आल्या आहेत. यातील काही प्रामाणिक कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना न जुमानता केलेली करवसुली कार्यालयाकडे जमा केल्याचा द्वेष म्हणून त्यांची बदली करून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या जनावरांच्या बाजारात आपल्या मर्जीतील गफला करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याचेही खात्रीलायक रित्या समजते. यात काही संचालक ही सामील असल्याची माहिती मिळाली आहे. थेट वृत्तपत्राकडे ही माहिती आल्यामुळे या राहता कृषी उत्पन्न बाजार समितीत चाललेल्या गुपित करवसुलीची इतर अनेक प्रकरने आता बाहेर येण्याची शक्यता आहे.

जनावरांच्या बाजारात कर वसूली साठी नियुक्ती मिळावी याबाबत एकमेकांमध्ये अंतर्गत धुसफूस चालू आहे. बाजार समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने या जनावरांच्या बाजारात अलीकडेच आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्याची नियुक्ती करून आपले इप्सित साध्य करण्याचे काम सुरू केले आहे. त्याची कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कुजबुज सुरू आहे. बाजार समितीचे पदाधिकारी या प्रकरणाची कशाप्रकारे हाताळणी करतात याकडे आता कर्मचाऱ्यांसह काही सभासदांचे लक्ष लागले आहे.



# भाजी मंडई ओस, विक्रेते रस्त्यावर वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

शहरातील लक्ष्मीनगर व मांडवगण रोड परिसरात अनधिकृत भाजी विक्रेत्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. भाजी विक्रेते भाजी मंडईत न बसता रस्त्यावरच दुकानं उघडत आहेत, ज्यामुळे वाहतूक कोंडी, रस्त्यावर चालण्यास अडचण आणि घरासमोर जाणेही कठीण झाले आहे. अनधिकृत मंडईमुळे राहिलेला भाजीपाला रस्त्यावर पडल्याने दुर्गंधी पसरत असून, मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. तसेच नगरपालिकेच्या झाडूवाल्यांचा नियमित फ ेरफटका नसल्याने परिसर अस्वच्छ होत आहे. स्थानीक नागरिकांनी दीड महिन्यापूर्वीच नगरपालिकेला निवेदन दिले होते, मात्र अद्याप ठोस कारवाई झाली नाही.

आज पुन्हा नागरिकांनी मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांचे कार्यालय गाठून निवेदन दिले असता, मुख्याधिकारी यांनी सात दिवसांत मंडई स्थलांतरित केली जाईल असा आश्वासन दिले. या आंदोलनात रवींद्र भोस, दीपक तरटे, प्रशांत साबळे, सुनील बसी, किशोर चाकणे, संभाजी वनपुरे, चव्हाण निखिल, साक्षी तरटे आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लोकसहभागातून साकारले भव्य संत सेना महाराज मंदिर

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

लोकसहभागातून काष्टी येथे संत सेना महाराजांचे भव्य मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरासाठी माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी स्थानिक विकास निधीतून दहा लाखांचा निधी दिला. अलीकडेच या मंदिरातील संत सेना महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना मा. मंत्री बबनराव पाचपुते व ठाकरे सेनेचे मुंबईतील कार्यकर्ते इम्रानभाई शेख यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी अध्यात्माचा जागर करण्यात आला. पाचपुते म्हणाले की, काष्टी येथील नाभिक समाजाची इच्छा होती की गावात संत सेना महाराजांचे मंदिर व्हावे. ती इच्छा आता पूर्ण झाली आहे.

या मूर्तीच्या उभारणीत इम्रानभाई शेख यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास आ. विक्रम पाचपुते, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सरपंच साजन पाचपुते, सरपंच ऋषिकेश शेलार, महेश्वर पतसंस्थेचे चेअरमन दत्तात्रय गावडे, साई सेवा पतसंस्थेचे चेअरमन ज्ञानदेव पाचपुते, काष्टी सोसायटीचे चेअरमन राकेश पाचपुते, खुलेश्वर पतसंस्थेचे चेअरमन सुनील दरेकर, स्वामी समर्थ पतसंस्थेचे चेअरमन आबा कोलटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण अण्णा नलगे, काष्टी नाभिक संघटनेचे अध्यक्ष आप्पा रंधवे, उपसरपंच सोमनाथ टिमुणे, चंदू पाचपुते तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारून चौक सुशोभिकरण करा- पुरनाळे

**शेवगाव । रयत समाचार**



शहरातील मध्यवर्ती भागातील विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चौकातील अर्धाकृती पुतळा उंचावर पूर्णाकृती स्वरूपात बसवून चौकाचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे तालुका चिटणीस किरण नारायण पुरनाळे यांनी केली. याबाबतचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले असून शासनाने तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सध्याचा अर्धाकृती पुतळा अनेक वर्षांपूर्वी उभारण्यात आला असून तो चौकाच्या मध्यभागी आहे. चारही बाजूंनी भरधाव वेगाने वाहने धावत असल्याने पुतळ्याला अपघाती धोका संभवतो. तसेच पावसाळ्यात पाण्याचे शिंतोडे उडून पुतळ्याचा सन्मान कमी होतो. लवकरच तिसगावपैठण हा सिमेंट कॉंक्रीट रस्ता याच चौकातून जाणार असल्याने पुतळ्याची उंची आणखी कमी दिसणार आहे. पुरनाळे यांनी स्पष्ट केले की, "महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानकार व सामाजिक न्यायाचे शिल्पकार आहेत. त्यांच्या पुतळ्याची सध्याची अवस्था योग्य नाही. त्यामुळे उंचावर पूर्णाकृती पुतळा बसवून चौकाचे सुशोभीकरण केलेच पाहिजे. अन्यथा येत्या काही दिवसांत आम्ही संवैधानिक मार्गाने आंदोलन करू." या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार मोनिका राजळे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी प्रसाद मते व नगरपरिषद मुख्याधिकारी विजया घाडगे यांना पाठविण्यात आली आहे.

## मयुरी केदार, सर्वज्ञ बडे यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

# रेसिडेन्शियल शाळेची तायक्कांदो स्पर्धेत चमकदार कामगिरी

**शेवगाव । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आणि न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील शेवगाव तालुकास्तरीय शालेय तायक्कांदो स्पर्धेत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे रेसिडेन्शियल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेवगाव चे विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली छाप पाडली. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या २९ किलो वजन गटात केदार मयुरी निवृत्ती हिने प्रथम क्रमांक पटकावला व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. तसेच, १४ वर्षांखालील मुलांच्या ३५ किलो वजन गटात बडे सर्वज्ञ महादेव यांनीही प्रथम क्रमांक मिळवून उत्कृष्ट कामगिरी बजावली. खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. रोहिदास गोरक्षनाथ जाधव यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे खेळाडूंनी हे यश मिळवले. या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य प्रा. बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक शिंदे, पर्यवेक्षक फटांगरे, तसेच सर्व शिक्षकवृंद व पालकांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष



डॉ. विवेक भापकर, सचिव अॅड. विश्वासराव आठरे पाटील व खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे यांनीही खेळाडूंचे अभिनंदन करून आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पाडेगाव ऊस संशोधन केंद्राला ४१ कोटी निधी

**राहुरी । रयत समाचार**



महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पाडेगाव ऊस संशोधन केंद्राला नवीन प्रशासकीय इमारत, शेतकरी प्रशिक्षण केंद्र, अतिथीगृह व कर्मचारी निवासासाठी महाराष्ट्र शासनाकडून ४० कोटी ९१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या मान्यतेसाठी माजी कृषिमंत्री व सध्याचे क्रीडामंत्री अॅड. माणिकराव कोकाटे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कुलगुरू डॉ. शरद गडाख, तुषार पवार, प्रतिभा पाटील, डॉ. विठ्ठल शिर्के यांचा मोलाचा पाठपुरावा झाला. ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे व अभियंता इंजी. मिलिंद ढोके यांनी प्रस्ताव सादर केला. या केंद्राने आजवर १७ ऊस वाण प्रसारित करून ११० शिफारशी दिल्या आहेत. 'फुले २६५' व 'को ८६०३२' या वाणाखाली राज्यातील ७५ टक्के क्षेत्र असून शेतकऱ्यांना तब्बल १,००,७८७ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. केंद्राच्या या कार्याचा गौरव करून शासनाने भरीव निधीस मान्यता दिल्याचे कुलगुरू डॉ. गडाख यांनी सांगितले.



# सावतानगर परीसरात नवीन डीपीची नागरिकांची मागणी

**श्रीगोंदा । रयत समाचार**

श्रीगोंदा शहरातील कोंबडे मळा, बनसुडे मळा आणि सावतानगर (जावईनगर) या दोन्ही वस्ती एकाच डीपीवर (DP) जोडलेल्या असून, त्या डीपीवर जास्त लोड येत असल्याने वारंवार डीव्ह (Div) जात आहे.

परिणामी, या परिसरातील वीजपुरवठा खंडित होत असून नागरिकांना अंधारात राहावे लागते. वीज कनेक्शन असूनही वीजपुरवठा नियमित न मिळाल्यामुळे येथील नागरिक संतापले आहेत. दिवसेंदिवस सतत लाईट दिवस-रात्र जाण्याच्या कारणाने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

यामुळे, परिसरातील नागरिकांनी लवकरात लवकर नवीन डीपी बसविण्याची मागणी उपअभियंता विज वितरण कंपनी, श्रीगोंदा यांना निवेदनाद्वारे केली आहे. शिवसेना शहर संघटक किरण बनसुडे, राजु बनसुडे, युवराज तांबे, सागर खेतमाळीस यांच्या सह परिसरातील नागरिकांचे हे निवेदन उपअभियंता श्रीगोंदा यांना दिले गेले.

# मुळा बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**नेवासा । विजय खंडागळे**



मुळा सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाली. ज्येष्ठ नेते माजी खासदार यशवंतराव गडाख व माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली ही सभा पार पडली.

बँकेचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब निमसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत व्यवस्थापक एस. एस. सिकची यांनी प्रास्ताविक व वार्षिक अहवाल सादर केला. सभेदरम्यान संस्थेच्या हितासाठी संचालक जालिंदर येळवंडे व ओंकार दरंदले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नेवासा तालुका स्टाफ सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी पत्रकार विजय खंडागळे यांची निवड झाल्याबद्दल मुळा बँकेच्या वतीने त्यांचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मान भाऊसाहेब निमसे, मुळा कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब लांडे, रावसाहेब लांडे व संचालक रामभाऊ कराळे यांच्या हस्ते करण्यात आला. सभेत अजेंड्यातील सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. या वेळी मुळा कारखान्याचे माजी संचालक भाऊसाहेब लांडे, रावसाहेब लांडे, संचालक सिताराम झिने, रमेश जंगले, भानुदास रेडे, एकनाथ जाधव, पंढरीनाथ मोरे, एस. के. दरंदले, एकनाथ जगताप, शिवाजी वाकचौरे, जालिंदर गावंडे, रामभाऊ कराळे, संजय गर्जे, विश्वनाथ बनकर, उत्तम शिरसाट, सोपान चौधरी, धनराज जाधव (शिरेगाव), पोपटराव रौंदळ (कांगोणी), मुळा बाजाराचे माजी व्यवस्थापक ओंकार दरंदले, सोन्याबाप्पू एडके, लेखापरीक्षक आर. एन. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. आभार प्रदर्शन संजय दरंदले यांनी मानले.

# अजरामर पार्श्वगायक मुकेश

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा आज स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. ''मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चिरपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षांनीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# संग्राम भंडारेंवर कायदेशीर कारवाई करा



## युवक काँग्रेसची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी संग्राम भंडारे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले गेले. कीर्तनकार म्हणून परिचित असलेले संग्राम भंडारे महाराज सतत समाजात भडकाऊ आणि भावनांशी खेळ करणारी विधाने करत असल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला आहे. मंगळवारी ता. २६ ऑगस्ट रोजी युवक काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांची भेट घेऊन सदर निवेदन दिले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष मोसिम शेख, भिंगार अध्यक्ष रिजवान शेख, पंढरीनाथ खेडकर, अभिजीत कांबळे, सागर इरमल, शामराव वाघस्कर, अकदस शेख, रियाज शेख, नवाज शेख, अमित लोखंडे, अय्याज शेख, हसन शेख आदी उपस्थित होते. अलीकडेच भंडारे यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या विरोधात ''आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल'' असे धक्कादायक विधान केले. काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मते, यामध्ये थोरात यांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. निवेदनात म्हटले आहे की, समाजामध्ये अशा प्रकारचे उघड दहशतवादी वक्तव्य करणाऱ्या आणि खालच्या थराला जाऊन धमक्या देणाऱ्या कीर्तनकारावर कारवाई न झाल्याने चुकीचा संदेश जात आहे. कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित कठोर कारवाई करणे आवश्यक आहे, असे सांगण्यात आले आहे. प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत ओगले यांनी सांगितले, ''कीर्तनकार संग्राम भंडारे यांनी बाळासाहेब थोरात यांच्या विषयी चुकीच्या विधान केले आहे. १५ दिवस उलटूनही कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. अशा प्रकारचे व्यक्ती ज्येष्ठ नेत्यावर खालच्या पातळीवर टीका करून धमक्या देत असल्यास पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे.''

# महाराष्ट्र पक्षिमित्र पुरस्कारांसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**अमरावती । रयत समाचार**

पक्षी संवर्धन, अधिवास जपणूक, संशोधन व जनजागृती या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे विविध पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. २०१९ पासून सुरू झालेल्या या पुरस्कार परंपरेत यावर्षीही महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार, पक्षी संशोधन पुरस्कार, पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार, पक्षी जनजागृती पुरस्कार, पक्षी साहित्य पुरस्कार यांचा समावेश आहे. याशिवाय यावर्षीपासून उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार नव्याने देण्यात येणार आहे.



पुरस्कारांची वैशिष्ट्ये : स्व. रमेश लाडखेडकर स्मृती महाराष्ट्र पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार २०२५ : ६० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या जेष्ठ व्यक्तीला, पक्षिमित्र चळवळीत दीर्घकाळ योगदानासाठी. स्व. डॉ. जी. एन. वानखेडे स्मृती महाराष्ट्र पक्षी संशोधन पुरस्कार २०२५ : पक्षी अभ्यास व संशोधनातील उल्लेखनीय कार्यासाठी. नामदेवराव बहादुरे पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार २०२५ : पक्षी संवर्धन, अधिवास जतन व जखमी पक्ष्यांच्या उपचारात कार्यरतांना. रामभाऊ शिरोडे स्मृती महाराष्ट्र पक्षिमित्र जनजागृती पुरस्कार २०२५ : पक्ष्यांबाबत जनजागृती करणाऱ्या व्यक्ती/संस्था. स्व. प्रकाशसिंह मोरे स्मृती उदयोन्मुख पक्षिमित्र पुरस्कार २०२५ : विद्यार्थी व नवोदित तरुण पक्षी अभ्यासकांना. श्रीमती सुशीला पाटकर स्मृती महाराष्ट्र पक्षिमित्र पक्षी साहित्य पुरस्कार २०२५ : पक्ष्यांविषयी लेखन करणाऱ्या लेखकास. पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख : ३० सप्टेंबर २०२५ असून प्रस्ताव पाठविण्याचा पत्ता : कार्यवाह, महाराष्ट्र पक्षिमित्र, डॉ. गजानन वाघ, ६३, अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४ किंवा ईमेलद्वारे pakshimitra@gmail.com ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात पुरस्कारार्थींची नावे जाहीर करण्यात येतील. अर्जाचा नमुना व सविस्तर माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.pakshimitra.org उपलब्ध आहे, अशी माहिती महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी दिली.

# धोत्रे ग्रामपंचायतीत राजकीय उलथापालथ; आजमभाई शेख यांचा काळेगटाला रामराम

**कोपरगाव । रयत समाचार**

काळे गटाच्या राजकारणाला कंटाळून धोत्रे ग्रामपंचायत सदस्य आजमभाई शेख यांनी काळे गटाला रामराम ठोकत कोल्हे गटात प्रवेश केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे काळे गटाला मोठा धक्का बसला असून गावात या घडामोडीची जोरदार चर्चा सुरू आहे.



गावातील विकास कामांना खोडा घालण्याच्या उद्देशाने काळे गटाकडून कोल्हे गटाच्या सदस्यांवर राजकीय दबाव व त्रास दिला जात असल्याची नाराजी ग्रामपंचायत स्तरावर व्यक्त होत होती. या विरोधातच आजमभाई शेख यांनी ''गावातील विधायक कामांत अडथळा न आणता आम्ही विकासाची वाटचाल करू'' या निर्धाराने कोल्हे गटाचा झेंडा हाती घेतला आहे. धोत्रे गावात मा. आ. स्नेहलता कोल्हे व विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली, लोकनियुक्त सरपंच प्रदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जलद गतीने विकासकामे सुरू आहेत. या कामांचा धसका घेत काळे गटाकडून होणारे राजकारण लोकांना मान्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. संजीवनी उद्योगसमूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांच्या हस्ते आजमभाई शेख यांचा कोल्हे गटात प्रवेश झाला. यावेळी शेख यांनी विवेक कोल्हे यांची भेट घेऊन ''गावाच्या विकासाठी आम्ही सर्व मिळून जोमाने काम करू'' असा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाला कोल्हे कारखाना संचालक बाळासाहेब वक्ते, सरपंच प्रदीप चव्हाण, उपसरपंच भाऊसाहेब गागरे, माजी उपसरपंच भगवानराव चव्हाण, किरण चव्हाण, विजय जामदार, सुरेश जाधव, जयवंत शिंदे, शेषराव शिंदे, सागर शिंदे, शाहरुख सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

# गणेशोत्सव काळात वाहतुकीवर निर्बंध

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

गणेशोत्सव काळात शहरातील प्रमुख चौक, मिरवणूक मार्ग आणि गणेश मंडळांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने गेल्या दोन दिवसांपासून विशेष वाहतूक नियोजन जाहीर केले आहे. गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतुकीस निर्बंध घालण्यात आले आहेत. मिरवणुकीच्या दिवशी तसेच उत्सव काळात काही रस्ते ठराविक वेळेसाठी बंद ठेवले जाणार आहेत. आजपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून, त्यापूर्वीच सार्वजनिक मंडळांचा आगमन सोहळा सुरू झाला आहे. त्यामुळे शहरांमध्ये खरेदीसाठी आणि गणपती आगमन सोहळ्यासाठी रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. पोलिसांनी शहरात येणाऱ्या वाहनांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिले आहेत. तसेच बाजारपेठेत चार चाकी वाहनांना येण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. वाहतूक नियंत्रणासाठी विविध ठिकाणी बॅरिकेट्स लावण्यात आले आहेत. उदाहरणार्थ: वनिता विद्यालयाहून समादेवी गल्लीकडे जाणाऱ्या चार चाकी वाहनांना आयडीबीआय बँकेसमोर बॅरिकेट्स लावून थांबविले जात आहे. धर्मवीर संभाजी चौकातून रामदेव गल्लीकडे जाणाऱ्या वाहनांना चौकातच थांबविण्यात येत आहे. सीबीटी कडून शनी मंदिरकडे जाणाऱ्या वाहनांना फोर्ट रोड जवळ थांबवले जात आहे. त्याचप्रमाणे, टिळकवाडी आणि सदाशिव नगर मार्गांवर बॅरिकेट्स लावून वाहतूक पर्यायी मार्गावर वळविण्यात आली आहे.


# जीवन जगण्याची खरी कला

किरण देशमुख, एक ३५ वर्षांचा सरकारी अभियंता, महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागात काम करत होता. तो स्वभावाने प्रामाणिक होता, पण त्याच्या खात्यात भ्रष्टाचाराचा काळा कारभार रोजच डोळ्यांपुढे यायचा. कंत्राटदारांकडून लाच घेणे, निकृष्ट कामांना मंजुरी देणे आणि मिळालेली रक्कम सहकाऱ्यांत वाटून घेणे, हा जणू खात्याचा अघोरी खेळ होता. किरणला हे सगळं खुपायचं, पण सगळे यात सामील असल्याने तो हतबल व्हायचा. ''मी एकटा काय करू?'' असा विचार त्याच्या मनात यायचा.काही वर्षांपूर्वी किरण जीवन जगण्याची कला शिकवणाऱ्या अध्यात्मिक संस्थेशी जोडला गेला होता. तिथल्या ध्यान-साधनेने शांती मिळते असे तिथले अनुयायी म्हणत. ही संस्था दुर्गम भागात मोफत शाळा चालवते, जिथे आदिवासी आणि गरीब मुलांना शिक्षण मिळते. किरणला हे काम प्रेरणादायी वाटायचं, पण त्याच्या खात्यातील भ्रष्टाचाराचा गढूळ प्रवाह त्याला अस्वस्थ करायचा.एके दिवशी सहकाऱ्यांनी त्याला ऑफिसच्या मागच्या खोलीत बोलावलं. टेबलावर नोटांचं बंडल ठेवलेलं होतं. ''किरण, हा तुझा वाटा. गेल्या कंत्राटातून मिळालाय. घे, आणि जास्त डोकं लावू नको,'' एक सहकारी म्हणाला.

किरणने नोटांचं बंडल हातात घेतलं, पण त्याच्या मनात अपराधीपणाची आग भडकली. ''मी आता धार्मिक संस्थेशी जोडलो आहे, हे पाप मला नको,'' तो स्वतःशी पुटपुटला. पण सहकाऱ्यांनी त्याला सुनावलं, ''किरण, तू घेतलं नाहीस तर आम्हा सगळ्यांशी गद्दारी होईल. घे आणि गप्प बस.'' त्या रात्री किरणला झोप लागली नाही. दुसऱ्या दिवशी तो जीवन जगण्याची कला शिकवणाऱ्या केंद्रात गेला आणि ज्येष्ठ प्रशिक्षक गुरुजींना भेटला. त्याने आपली सगळी व्यथा मांडली. ''गुरुजी, माझ्या खात्यात सगळे भ्रष्टाचार करतात. मला त्या पैशांचा वाटा घ्यावाच लागतो, नाहीतर सहकाऱ्यांना संशय येतो. पण ती रक्कम हातात घेतल्यावर मला अपराधी वाटतं. मी तुमच्या संस्थेशी जोडलो आहे, मला असं जगणं नको. मी काय करू?'' गुरुजी शांतपणे ऐकत होते. मग ते म्हणाले, ''किरण, तुला अपराधी वाटतंय, हे तुझ्या शुद्ध मनाचं लक्षण आहे. ती रक्कम आमच्या संस्थेला दान कर. आम्ही त्या पैशांतून दुर्गम भागात मोफत शाळा आणि जलसंधारण प्रकल्प चालवतो. तुझ्या हातून समाजाचं भलं होईल. तुला पुण्य मिळेल'' किरणला गुरुजींचं उत्तर ऐकून धक्काच बसला. त्याच्या मनात प्रश्नांचं वादळ उठलं. ''भ्रष्टाचारातून आलेल्या पैशांनी काम होऊ शकतं पण त्याला चांगलं काम कसं म्हणता येईल? चांगल्या कामासाठी लागणारी संपत्ती ही प्रामाणिक मार्गाने यायला हवी, की नाही?'' त्याने हिम्मत करून विचारलं, ''गुरुजी, तुमच्या संस्थेला अशा पैशांची गरज आहे का? भ्रष्टाचारातून आलेल्या संपत्तीवर तुमच्यासारख्या संस्था चालतात का?'' गुरुजींनी हसत उत्तर दिलं, ''किरण, पैसा हा फक्त साधन आहे. तो कसा वापरला जातो, यावर सगळं अवलंबून आहे. तू त्या पैशांचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी कर, म्हणजे तुझं पाप धुतलं जाईल.'' पण किरणचं मन शांत झालं नाही. त्याला वाटलं, ''ही संस्था जर भ्रष्टाचाराच्या पैशांवर चालत असेल, तर मी यात का सामील झालो?म्हणजे हे एक प्रकारचे भ्रष्टाचाराला प्रोत्साहन दिल्यासारखे झाले'' किरण घरी परतला आणि रात्रभर विचार करत बसला. त्याला आठवलं, की जीवन जगण्याची कला शिकवणाऱ्या संस्थेने दुर्गम भागातील शाळेत मुलांना मोफत शिकवण्याचे काम हाती घेतले आहे. त्याचबरोबर अनेक ठिकाणी लाखो रुपये फी घेऊन ही धार्मिक संस्था शाळा चालवत आहेत. खेडोपाडी जलसंधारणाच्या सारखे प्रकल्प संस्था राबवते आहे. त्या जोडीला योग क्रिया प्रशिक्षणाची फी सुद्धा आकारते आहे. त्याच्या मनात शंका आली, ''हे सगळं खरंच शुद्ध हेतूने होतं, की फक्त लोकांच्या धार्मिक भावनांशी खेळून त्यांना प्रभावित करून आपला व्यवसाय करण्यासाठी! भ्रष्टाचाराच्या पैशांवर अवलंबून असलेल्या संस्थेचा मी अनुयायी का असावा? ''दुसऱ्या दिवशी किरणने एक ठाम निर्णय घेतला. त्याने त्या भ्रष्टाचाराच्या पैशांना हात न लावता ठेवलं आणि आपल्या खात्यातील

शंकर बहिरट
९८५०२४०१३०

साहित्यवार्ता



भ्रष्टाचाराची माहिती गोळा करायला सुरुवात केली.

त्याने आपल्या सहकाऱ्यांना स्पष्ट सांगितलं, ''मी यापुढे अशा कामात सामील होणार नाही.'' सहकाऱ्यांनी त्याला धमकावलं, पण किरण डगमगला नाही. त्याने एका विश्वासू पत्रकाराच्या मदतीने ती माहिती भ्रष्टाचारविरोधी यंत्रणेपर्यंत पोहोचवली. काही महिन्यांनी खात्यातील भ्रष्टाचाराची चौकशी सुरू झाली. किरणला जीवे मारण्याच्या धमक्या येत आल्या पण तो डगमगला नाही. किरण जीवन जगण्याची कला शिकवणाऱ्या केंद्रात गेला आणि गुरुजींना शांतपणे सांगितलं, ''गुरुजी, मी तुमच्या सल्ल्याचं पालन केलं नाही. भ्रष्टाचाराच्या संपत्तीवर अवलंबून असलेल्या आणि प्रसिद्धीचे स्तोम माजवणाऱ्या संस्थेचा अनुयायी होण्यापेक्षा, मी माझ्या अंतर्मनाचा मार्ग निवडला. माझं अंतर्मन मला खरा आणि प्रामाणिक मार्ग दाखवेल. आपले अंतर्मन शुद्ध असेल, तर जीवन जगण्याची कला आपले अंतर्मनच शिकविल, त्यासाठी कोणत्याही धार्मिक संस्था किंवा बाबा-बुवांची मला आवश्यकता नाही.'' गुरुजी काहीच बोलले नाहीत, फक्त गूढ हसले. किरण तिथून बाहेर पडला, आणि त्याच्या चालण्यामध्ये एक नवीन आत्मविश्वास होता. वेगळीच शांती होती.त्याला ठाऊक होतं, की त्याने निवडलेला मार्ग कठीण आहे, पण तो शुद्ध आणि सत्याचा आहे. त्याच्या हृदयातली अपराधी भावना कायमची नाहीशी झाली होती, आणि त्याला खऱ्या शांतीचा अनुभव येत होता.

*(सत्य घटनेवर आधारित कथेतील नाव काल्पनिक आहे)*